# प्रवीण बांदेकर यांची कविता

**श्री. श्रीकांत दत्तात्रय तनपुरे**
सहाय्यक प्राध्यापक
श्री संत गजानन महाविद्यालय खर्डा,
ता. जामखेड, जि. अहमदनगर

**प्रास्ताविक :**

प्रवीण बांदेकर यांनी कादंबरी लेखनाबरोबरच कविता लेखनही केलेले आहे. त्यांच्या नावे काही कवितासंग्रह प्रकाशित आहेत. त्यांची कविता ९०च्या दशकातील आहे. त्यांच्या कविता वेगवेगळ्या नियतकालिक, अनियतकालिक यांमधून प्रकाशित होत असत. ९०च्या दशकात व २१व्या शतकातील पहिल्या दशकात त्यांच्याकडे कोकणातील प्रश्न मांडणारा, मच्छीमारांची व्यथा सांगणारा, आधुनिक स्थित्यंतरावर बंड करणारा कवी म्हणून पाहत होते. बांदेकर यांचा पहिला कवितासंग्रह 'येरू म्हणे' हा शब्दालय प्रकाशनाने सन २००० मध्ये प्रकाशित केला. व त्यांचा दुसरा कवितासंग्रह 'खेळखंडोबाच्या नावानं' २००५ मध्ये लोकवाङ्मय गृह या प्रकाशन संस्थेने प्रकाशित केला.

प्रवीण बांदेकर यांच्या कवितासंग्रहाविषयी वसंत आबाजी डहाके म्हणतात, “बांदेकरांच्या कवितेमध्ये जागतिकीकरण, उदारीकरण तसेच गुन्हेगारी प्रवृत्तीचे चित्रण गाव व्यवस्था तसेच आधुनिकतेच्या रेट्यामधील बालपण, किशोरवयीन पण, तरुणपण, तरुणांच्या वाढत्या समस्या, नोकरी, रोजगार न मिळाल्यामुळे तरुणांचा गुन्हेगारीकडे वळणारा लोंढा अशा अनेक समस्या घेऊन गावातील देव देवळे प्रथा-रुढी अशा गोष्टींचे चित्रण, एक लेखक म्हणून लिहीत असतानाच्या अडचणी लेखक म्हणून जगत असतानाच्या भलावना कवितेमधून अभिव्यक्त होताना दिसतात."[१]

बांदेकरांच्या कवितेचा महत्त्वाचा विषय तरुण व तरुणांपुढील समस्या हा असलेला दिसतो. तरुणांना रोजगार उपलब्ध न झाल्याने तरुण हा गुन्हेगारी पाशात कसा अडकला जातो याचे चित्रण त्यांच्या कवितेत येताना दिसते. त्याचबरोबर त्यांच्या कवितेत त्यांचा असणारा गाव व गावाभोवतीचा परिसर ते चित्रित करताना दिसतात.

लेखकांच्या कविता निर्मितीचा कालखंड हा नव्वदचे दशक आहे. या दशकामध्ये महाराष्ट्रातील समाज चंगळवादी बनत चाललेला दिसून येतो. याच दशकात राजकीय क्षेत्रात हिंसाचाराचे प्राबल्य, विविध पक्षात गटतट निर्माण झालेले दिसतात. शैक्षणिक क्षेत्रातील शिक्षण संस्था अर्थप्राप्तीची साधन बनत चाललेला हा कालखंड आहे. एकीकडे जागतिकीकरणाचा रेटा वाढत असतानाच बुद्धिजीवी लोक देव-धर्म कर्मकांड यांकडे ओढले जाताना दिसणारा कालखंड साहजिकच बांदेकरांसारख्या तरुण पिढीतील लेखकांच्या नजरेतून असा खेळ सुटण शक्य नाही. त्यांनी आपल्या कवितांमधून अतिशय परखडपणे वास्तव मांडून त्यांची भूमिका स्पष्ट केलेली दिसते.

**येरू म्हणे:**

प्रवीण बांदेकर यांच्या साहित्य क्षेत्रातील हे पहिले प्रकाशित पुस्तक आहे. 'येरू म्हणे' या कवितासंग्रहाने त्यांचे साहित्य क्षेत्रामध्ये पदार्पण झाले.

'येरू म्हणे' हा कवितासंग्रह सन २००० मध्ये शब्दालय प्रकाशन श्रीरामपूर या प्रकाशन संस्थेने प्रकाशित केला. या कवितासंग्रहामध्ये एकूण सहा कविता आहेत. या कवितासंग्रहातील कवितांचा लेखनकाल १९८८ ते १९९८ असा दहा वर्षांचा आहे. त्यांच्या या कवितासंग्रहातील कविता अनुष्टुभ, मौज, हंस, अक्षर अशा अनेक नियतकालिकांतून प्रसिद्ध झालेल्या आहेत.

बांदेकरांच्या कवितेविषयी रंगनाथ पठारे म्हणतात, “ही कविता एका कवीच्या आंतरिक कल्लोळाच्या वर्तमानाची कविता आहे. तिचे नाते कणाकणाने प्रवाहित होत, शतकांमधून पाझरत आपल्यापर्यंत आलेल्या तुकोबाच्या कवितेशी आहे. आयुष्य जगताना आरंभाची कोवळीक मिटत जाऊन निबर होत जाणे असा संस्कार ठरतो हे खरे असले तरी कोवळीकीचे भान संपत नाही. वाहणे, वाहण्याची कांक्षाकरणे संपत नाही हे कवी असण्याचे अस्सल प्रारब्ध ही कविता अत्यंत ठसठशीतपणे व्यक्त करते"[२]

बांदेकरांनी आपल्या कवितासंग्रहात वर्तमानाची कविता जरी सांगितलेली असली तरी तिचे नाते आपल्याला तुकारामांच्या कवितेशी असल्याचे रंगनाथ पठारे सांगतात. त्यांची कविता एका आंतरिक कल्लोळाच्या वर्तमानाची कविता आहे. कवी आपल्या कवितेत लिहितो,

‘अगदी पहिल्यांदा
मिसरूड फुटायच्या दिवसांत
कविता रुजवायला लागलेलो तेव्हा
किती मनमावी वाटायचं
डोंगर
घसरणं
ठेचाळणं
रक्ताळणं आणि तरीही कमी नाही व्हायची उर्मी’

कवी आपल्या 'विधान' या कवितेत त्यांची सुरुवातीच्या दिवसातील म्हणजे मिसरूड फुटायच्या दिवसातील त्यांच्या मनातील उर्मी आपल्याला सांगत आहेत. कितीही ठेचाळलोत, रक्ताळलोत, घसरलोत तरी एक त्यातून प्रेरणा घेऊन पुढे चालत राहत, असे आपल्याला 'विधान' कवितेत कवी सांगतात. तसेच कवी आपल्या काही कवितांमधून साहित्यिक संदर्भ देताना दिसतात. तसेच कॉलेज जीवनात घडलेल्या साहित्यावरील वादावादी सांगू पाहतायत. कवी म्हणतात, फुल्यांवर बोललो, फ्रॉईडवर चर्चा केली, वादावादी केली एलियटच्या कवितेवर बोलताना अशा प्रकारे लेखक आपल्या कॉलेज जीवनातील साहित्यिक जडणघडण सांगू पाहतायत. खरेतर लेखक प्रवीण बांदेकर यांच्यावर कॉलेज जीवन जगत असतानाच साहित्यिक संस्कार बिंबत गेलेले दिसतात. म्हणूनच आज त्यांचे साहित्य लेखन हे दर्जेदार असलेले पाहायला मिळते, हे एका एकी निर्माण होत नसतं तर त्याचा संस्कार हा उर्मीच्या काळापासून चालत आलेला असला पाहिजे. प्रवीण बांदेकर आपल्या कवितेतून कविता निर्मितीच्या वेळेस कवीची होणारी घुसमट, धडपड आपल्या काही कवितेमधून मांडू पाहतायत. कवी म्हणतो,

'शब्द शोधतोय
मला पर्याय,
गवसेल तुझ्या अखंड पात्रात म्हणून डुबकळतोय
पुनःपुन्हा कोरडी वाळूच नाकातोंडात
आणि जीवघेणी घूसमट'

तसेच 'काळोखात कासव' या कवितेत कवी म्हणतो,

'कवी जो स्वतःला पोभेट म्हणवतो
बंद असतो दिवसभर घरात खिडक्या दाराआत
आणि तिन्हीसांज नंतरच पडतो घराबाहेर'

लेखक होत असताना आपल्याला वेगवेगळ्या प्रकारच्या घुसमटीतून जावे लागते. साहित्य निर्मिती करताना आपल्याला ओढूनताडून त्याची निर्मिती करता येत नसून ती उत्स्फूर्त आली पाहिजे. ती केव्हाही दिवसभर असू शकत नाही. तर त्याचा एक काळ असतो. तसेच 'घोरपडी सारखा' या कवितेतून कवी सांगतात,

'कवीला कळत नाही
डोंगराचा कल
कवीला सापडत नाही
डोंगराची कळ'

वर दिलेल्या कवितेवरून असे लक्षात येते की, कवी स्वतःबद्दल म्हणजे एखाद्या कवी बद्दलच कविता निर्माण करतो. त्या कवीला निर्मितीसाठी करावे लागणारे प्रयत्न, अडचणी सांगण्याचा प्रयत्न कवी करतो. अशा आशयाच्या कविता निर्माण करण्याचा नवीन प्रयत्न लेखकाने केलेला दिसून येतो.

कवीने आपल्या काही कवितेमधून आजूबाजूचा परिसर तसेच पारंपरिकता, देव, दैवत, जत्रा, नदी, डोंगर, पाऊस अशा विषयांवरसुद्धा लेखकाने लेखन केलेले दिसून येते. 'मूळ भूमिका' या कवितेत देवी, समुद्रग्रस्त तू, नदीच्या नावनं, वारुळे, कौल अशा उपकवितेत पारंपरिक व भौगोलिक विषय हाताळलेले दिसतात.

'येरू म्हणे' या कवितासंग्रहातील काही कवितांमधून राजकीय तसेच औद्योगिकीकरणाचे आक्रमण दर्शवलेले आहे.

कवी 'शहाणी माणसं' या कवितेत म्हणतो,

'मग रुंद कराव्यात पायवाटा,
तोडून कचाकचा अतिक्रमण करणारी झाडं,
आटवावा तळ्याचं प्रतिबिंब मिटवणारं पाणी
दुरुस्ती आणि स्वच्छतेचं सफाईदार कारण पुढे करून
हाताशी धरून'

या कवितेतून कवी आपली व्यवस्थेविषयीची व औद्योगिक व्यवसाय,मोठमोठ्या कंपन्या उभारणाऱ्या लोकांविषयीची उदासीनता स्पष्ट करताना दिसतात. मोठ मोठे उद्योग कंपन्या उभारण्यासाठी, पाईपलाईन्स नेण्यासाठी जमीन खोदाई करून तसेच वेगवेगळया मध्ये येणारे झाडी तोडून व्यावसायिक फायदा करणाऱ्या लोकांवर पांघरुण घालायला राजकीय व्यवस्था व प्रशासकीय व्यवस्था कशी सक्षम आहे हे त्यांनी यामधून आपल्याला सांगितले आहे. कल्याणकारी योजनेच्या नावाखाली विकासाचे आराखडे दाखवत राजकीय लोक उद्योगपतींना सर्वसामान्यांच्या जमिनी विकण्यास भाग पाडतात. व स्वतःच्या शुल्लक फायद्यासाठी इतरांचे खूप मोठे नुकसान करतात.

'येरू म्हणे' या कवितासंग्रहातून लेखकाने जागतिकीकरण तसेच पारंपरिक संदर्भ, राजकीय घटक, सामाजिकता अशा अनेक घटकांच्या अनुषंगाने त्यांनी आपल्या कवितेतून समाज आणि त्याच्या अवती भवती घडणाऱ्या बऱ्या वाईट, न्याय-अन्याय, अस्तिक, नास्तिक गोष्टींचे चित्रण केले आहे.

**खेळखंडोबाच्या नावानं:**

प्रवीण बांदेकर यांनी 'खेळखंडोबाच्या नावानं' हा कवितासंग्रह २००९ साली 'लोकवाङ्मय गृह' या प्रकाशन संस्थेकडून प्रकाशित केला. या कवितासंग्रहात 'नांदी' आणि 'भरतवाक्य' अशा कविता आहेत. परंतु नांदी या कवितेनंतर त्यांच्या संग्रहात एक दीर्घकाळ आलेला आपल्याला दिसतो. या कवितासंग्रहात कवी महानगरापासून ते गावपातळीपर्यंत बोकाळत चाललेल्या बाजारू वृत्ती आपल्यासमोर लेखक मांडतो. या कवितासंग्रहातून आपल्याला लेखक एक वेगळा साहित्यिक प्रयोग हाताळताना दिसतो. ह्या कवितासंग्रहातील कवितेमध्ये कवीने यमकांचा वापर

केलेला दिसून येत नाही. कवितेमध्ये काही ओळी अतिशय दीर्घ आहेत, तर काही लहान आहेत. त्यामधून लयबद्धता दिसून येत नसली तरी त्यांच्या कवितेमधील प्रत्येक ओळीमध्ये आशय निघतो. कवितासंग्रहात प्रतिमा आणि प्रतिकांचा वापर केलेला आहे. कवीने एकाच कवितेत अनेक आशय विषय हाताळलेले आहेत. हा एक नवीन आकृतिबंध आपल्याला पाहायला मिळतो.

कवितासंग्रहाच्या मलपृष्ठावर म्हणले आहे, 'या कवितासंग्रहात कवीने महानगरापासून ते गावपातळीपर्यंत बोकाळत चाललेल्या बाजारू व्यवस्थेमध्ये सामान्य माणूस त्याने आजवर पिढ्यानपिढ्या जिवापाढ जपलेली मूल्ये, परंपरा व पूर्वसंचितापासून उखडला जात आहे. अशा सांस्कृतिक पडझडीच्या वर्तमानाचे रूपक म्हणूनच या दीर्घ कविताकडे पाहता येते. उजेडासाठी जगण्याची स्वप्ने भंग पावलेल्या तरीही संवेदनांची धुगधुगी शाबूत असलेल्या माणासांचा प्रतिनिधी म्हणून या कवितेत कवींची प्रतिमा येते. कालचे जगणे आज नाही, आजचे जगणे उद्या नसेल या भयावह जाणिवेमुळे अस्वस्थ झालेला हा कवी आपल्या भावना कवितांमधून मांडताना दिसतात. सर्वसामान्य माणसांच्या पारंपरिक पद्धतीने आलेल्या शेत जमिनी तुटपुंज्या कंपनीला मातीमोल भावात जातायत. वर्षानुवर्षे जोपासत आलेले झाडेझुडपे तोडली जातायत या आधुनिक व्यवस्थेमुळे. कवी आपली अस्वस्थता या कवितासंग्रहातून व्यक्त करतात.

या कवितासंग्रहातून कवीने नोकरीविषयी करावा लागणारा संघर्ष दर्शवलेला आहे. नोकरीसाठी स्वतःचा स्वाभिमान गहान टाकावा लागतो हे आजच्या स्थितीचं चित्रण दाखवलेले आहे. कवी म्हणतो,

'ऐकीव वार्ताचा अंगारा लावीत ग्रॅज्युएट-पोस्ट
ग्रॅज्युएट कपाळावर
नतमस्तक होतेय फायलीसमोर वेळी अवेळी
दिवसाढवळ्या जसा झुकतो बिछान्यातल्या
बायलीसमोर अपरात्रीसुद्धा'

अशा प्रकारे कवी तरुणांपुढील नोकरीची समस्या व नोकरीसाठी करावा लागणारा संघर्ष स्पष्ट करतो. कवीने सरकारी धोरणावर टीका केलेली दिसते. शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्यावर सरकारचे काम फक्त चौकशा समित्या नेमून आणि तिजोरीत देवळा बिवळासाठी दगडबिगड साठवून ठेवणे. सरकारविषयी लेखक ही अस्वस्थता दर्शवितात. लेखक एकूण ह्या सर्व व्यवस्थेवर बंड करताना दिसतोय. कवीला सरकारचे धोरण बरोबर वाटत नाही. ग्रॅज्युएट-पोस्ट ग्रॅज्युएट झालेले विद्यार्थी नोकरीसाठी तळमळतायत. शेतकरी आत्महत्या करतायत अशा विविध विषयांवर लेखक आपल्या कवितेत लेखन करताना दिसतात.

कवी आपल्या कवितेतून बदलत्या समाज जीवनाचे चित्रण रेखाटताना दिसतो. कवी म्हणतो,

'सैरभैर वासरं बारमध्ये घुसतील,
एड्सग्रस्त वेश्या देवळात वाती वळतील,
शाळकरी पोरांच्या'

जागतिकीकरणाच्या रेट्यामुळे पावलोपावली झालेले हॉटेल्स, बार व त्यामध्ये चालणारे सेक्स रॅकेट यामुळे समाज बिघडत चालेला आहे, हे कवी आपल्या कवितेतून सांगू पाहतोय.

कवीने आपल्या कवितेतून डोंगर, नदी, कुणगे, घरं, देऊळ गावातील आजूबाजूच्या घटनांविषयी आपली श्रद्धा दाखवलेली आहे. परंपरेने आलेले सण, उत्सव, एकादशी, आषाढी- कार्तिकी, श्रावणातले उपासतापास, पोथ्या अशा संदर्भातील 'श्रद्धा' कवितासंग्रहात व्यक्त केली आहे. कवीने वाढत्या इंटरनेटचा विपर्यास आपल्या कवितेमधून दर्शविला आहे. मुलगा आणि वडील यांचा संवाद होत नाही. मुलांच्या वडिलांना पडलेली खंत बांदेकर आपल्या कवितेत मांडतात. ते म्हणतात,

'कळू लागले तेव्हा कदाचित
खासगी संवादासाठीही आपल्यातल्या
धुंडाळावं लागेल तुला मला
एखादं ई-मेल, इंटरनेट, वेबसाईट डब्ल्यू डब्ल्यू डब्ल्यू
पिता-पुत्र संवाद डॉट कॉम'

अशा प्रकारे कवी आपल्याला सांगतो की, पिता-पुत्र संवाद डॉट कॉम वेबसाईट भविष्यात चालू करावी लागेल. ही वर्तमान आणि भविष्य स्थिती कवी आपल्या या कवितेत सांगतो. 'भरत वाक्य' या कवितेत कवीने संस्कृती, सत्याग्रह, धर्मपरंपरा, स्वदेशी राहू अशा प्रकारची देशीवादी भूमिका या कवितेतून मांडलेली आहे.

समारोप :

'प्रवीण बांदेकर यांची कविता' या लेखामध्ये त्यांनी लिहिलेले 'येरू म्हणे' आणि 'खेळखंडोबाच्या नावानं' या दोन कवितासंग्रहाची रचनात्मकता व आशयात्मकता समजून घेण्याचा प्रयत्न केला.

**संदर्भ ग्रंथ व टिपा:**

१. डहाके वसंत, 'कवितेविषयी', स्वरूप प्रकाशन, प्रथमावृत्ती १९९, पृ. २३.
२. पठारे रंगनाथ, 'येरू म्हणे', शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, प्रथमावृत्ती २०००, मलपृष्ठ